अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शनिवार
१९.०९.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २३१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## दुष्काळी बैठकीतील काजू-बदाम प्रकरणावर फडणवीसांचे स्पष्टीकरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**मुंबई** – मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सरकारी बैठकीत नेत्यांना खाण्यासाठी काजू आणि बदामांची व्यवस्था करण्यात आल्याच्या मुद्द्यावरुन वाद निर्माण झाला आहे.

याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. राज्यात शेतकऱ्यांची (परिस्थिती बिकट असताना मंत्री आणि सरकारी अधिकारी काजू, बदामावर ताव मारत असल्याच्या मुद्द्यावरुन संताप अनेकांनी व्यक्त केला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना भाष्य केले.

साधारणपणे आपल्याकडे पद्धत आहे बैठकांमध्ये प्रशासन ड्रायफूट आणून ठेवते. अशा गोष्टी टाळल्या पाहिजे. पण जाणीवपूर्वक दुष्काळ आहे म्हणून असं कोणीतरी करतंय, हे म्हणणे योग्य नाही. पण प्रशासनाने काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि संवेदनशीलपणे वागले पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

राज्यातील अनेक जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस नसल्याने पिकं खराब झाली आहेत. उतारा कमी येईल, अशी परिस्थिती आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्वच मंत्र्यांनी याबाबत चर्चा करुन आपापल्या जिल्ह्यात आढावा घेऊन तयारी करण्याचे आदेश आपण दिले आहेत.

पुढच्या आठवडाभरात आम्ही प्राथमिक आढावा आणि पंचनामे करुन मदत करु, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

## आई-वडिलांच्या अंथरुणातून ८ महिन्यांची चिमुरडी गायब

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### पोलिसांच्या चौकशीनंतर संशयिताची आत्महत्या



**नाशिक** – जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील मन्याड चौकी परिसरातून ८ महिन्यांची चिमुरडी बेपत्ता झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. तब्बल ३६ तास उलटूनही या बाळाचा कोणताही शोध लागलेला नाही. त्यातच या प्रकरणात संशयित म्हणून चौकशी करण्यात आलेल्या एका इसमाने गळफास घेऊन जीवन संपवल्याने या संपूर्ण प्रकरणातील गूढ अधिकच वाढले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गुरुवारी (दि.१७) मध्यरात्री मन्याड चौकी येथे राहणारे मच्छिंद्र मोरे हे आपल्या कुटुंबासह घराबाहेर झोपलेले होते. मध्यरात्री १२ वाजेच्या सुमारास मच्छिंद्र आणि त्यांच्या पत्नीच्या मध्यभागी झोपलेली आठ महिन्यांची चिमुरडी 'तनु' अचानक बेपत्ता झाली. जाग आल्यावर बाळ अंथरुणात दिसले नाही, त्यामुळे कुटुंबीयांनी आणि ग्रामस्थांनी परिसरात शोध घेतला. मात्र, ती सापडली नाही. यानंतर पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली.

**पोलिसांचा कसून तपास**

घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तपासादरम्यान श्वान पथकाचा वापर करण्यात आला. श्वान पथकाने दाखवलेल्या मार्गांवरून आणि संशयावरून पोलिसांनी काही जवळच्या नातेवाईकांसह इतर संशयितांची चौकशी केली. यामध्ये श्रावण मोरे नामक इसमाचीही काल रात्री उशिरापर्यंत चौकशी करण्यात आली होती. चौकशीनंतर सर्व संशयितांना घरी सोडण्यात आले.

या घटनेनंतर श्रावण मोरे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नांदगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. मयत श्रावण मोरे यांच्या नातेवाईकांनी आणि स्थानिक ग्रामस्थांनी नांदगाव ग्रामीण रुग्णालयात ठिय्या मांडला.

पोलिसांनी चौकशीदरम्यान केलेल्या मारहाणीमुळे आणि दिलेल्या त्रासामुळेच श्रावण मोरे यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा गंभीर आरोप मयताचा मुलगा सुनील मोरे व सून सुनीता मोरे यांच्यासह नातेवाईकांनी केला आहे.

### थोडक्यात

## अवघ्या महिनाभरापूर्वी विवाह ! अभियंता तरुणाची रेल्वेसमोर आत्महत्या


(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अवघ्या महिनाभरापूर्वी विवाह झालेल्या २८ वर्षीय अभियंत्याने रेल्वेसमोर झोकून देत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना जळगाव शहरात बजरंग बोगद्याजवळ घडली आहे. गौरव हरिश्चंद्र देशमुख (रा.गणेश कॉलनी) असे मृत तरुणाचे नाव आहे. गौरवने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.या प्रकरणी लोहमार्ग पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे. बजरंग बोगद्याजवळ पोहोचला अन... गौरव देशमुख व्यवसायाने अभियंता होता. त्यासोबतच तो बांधकाम मक्तेदारीचे कामही करत होता.

## कोल्हापूर-मिरज-पुणे मार्गावरील प्रवाशांची तक्रार


(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कराड** – येथून जात असलेल्या कोल्हापूर येथील छत्रपती शाहू महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकावरून व कर्नाटकातील मिरज–बंगळुरू रेल्वे मार्गावरून पुणे, मुंबईकडे व परत धावणाऱ्या बहुतेक सर्वच एक्स्प्रेस गाड्यांमध्ये गोर–गरिबांसाठी कमी प्रवास डब्यात पार्सल व कुरिअर कंपन्यांच्या बेकायदा पार्सल गाठोड्यांमुळे व गठ्ठानमुळे प्रवाशांची बसण्याची बाके व्यापली जात असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.










## महायुती सरकारमधील मंत्र्याला रिझर्व्ह बँकेचा दणका

### जिल्हा बँकेच्या संचालक पदावरुन उचलबांगडी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – महायुती सरकारमधील सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यावर रिझर्व्ह बँकेने थेट नियमभंगाची कारवाई करत संचालकपदावरून बडतर्फ केले आहे.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ राहिल्याने आरबीआयच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवत ही धडक कारवाई करण्यात आली आहे.

लातूर येथील बँकेचे सभासद आणि अधिकृत मतदार प्रतिनिधी सतीश शेषराव जाधव यांनी २५ मे २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे तक्रार दाखल केली होती. बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियम, २०२५ मधील नियमांनुसार, कोणत्याही सहकारी बँकेत १० वर्षांपेक्षा जास्त काळ संचालक पद भूषवलेली व्यक्ती पुढील निवडणुकीसाठी अपात्र ठरते. या कायद्याच्या आधारे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान १९ संचालक मंडळातील ८ संचालकांनी १० वर्षांपेक्षा अधिक काळ काम केल्याचा दावा करत त्यांच्या अपात्रतेची मागणी करण्यात आली होती.



# एमपीएससी अध्यक्षांनी राजीनामा द्यावा

## रोहित पवारांनी दिली सरकारला एक आठवड्याची मुदत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभारावरून तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांवरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

सरकारने एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या अन्य मागण्यांबाबत आठवडाभरात ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास पुण्यात पुन्हा मोठे आंदोलन



करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना त्रास होऊ नये आणि सुरक्षा यंत्रणेवर अतिरिक्त ताण पडू नये, यासाठी विद्यार्थ्यांनी आंदोलनाला तात्पुरती स्थगिती दिली असल्याचे पवार यांनी सांगितले. हा आंदोलनाचा शेवट नसून सरकारला आपल्या भूमिकेत सुधारणा करण्यासाठी दिलेली मुदत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एमपीएससीच्या कृषी सेवा परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. या प्रकरणी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी विद्यार्थी आणि रोहित पवार यांच्याकडून करण्यात येत आहे. पवार यांनी चौकशी समित्या किंवा विशेष तपास पथकाच्या माध्यमातून वेळकाढूपणा करण्याऐवजी अध्यक्षांवर थेट कारवाई करावी, अशी भूमिका मांडली आहे. दरम्यान, भीमनवार यांनी आरोप फेटाळताना त्यांच्या कार्यकाळात झालेल्या घटनांबाबत पुरावे सादर झाल्यास पदावर राहणार नसल्याचे म्हटले आहे.

गणेश विसर्जनापर्यंत एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याबाबत आणि ७० हजार पदांच्या भरतीबाबत ठोस निर्णय न झाल्यास पुण्यात पुन्हा आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाची तारीख, वेळ आणि ठिकाण लवकरच जाहीर केले जाईल, असे पवार यांनी सांगितले.

## पी.एम.श्री.न.प.उच्च प्राथमिक शाळा क्र.४ येथे

# पालक व शिक्षक महविचार सभा उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – पी.एम.श्री.न.प.उच्च प्राथमिक शाळा क्र.४ येथे पालक व शिक्षक सहविचार सभा उत्साहात पार पडली. या सभेत नवीन शाळा व्यवस्थापन समिती गठीत करणे, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती उंचावणे, पालक-शिक्षक समन्वय वाढविणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी नियोजन करणे हा सभेचा प्रमुख उद्देश होता. या सभेत शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. माधव तिडके यांनी नियोजनबद्ध पद्धतीने योग्य



समन्वयातुन घडवून आणली. विद्यार्थ्यांचा नियमित अभ्यास व शैक्षणिक प्रगती, मंथन सामान्य ज्ञान परीक्षा, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षांच्या तयारीबाबत महत्त्वपूर्ण चर्चा चाफले यांनी घडवुन आणली.

शाळा आणि पालक यांच्या संयुक्त प्रयत्नातून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी भक्कम पाया घालण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. सभेचे अध्यक्षपद महिला बालकल्याण उपसभापती माधुरी माहोरे यांनी तर प्रमुख पाहुणे म्हणुन नगरसेवक हर्षल फुटाणे राकेश दवंडे, मुख्याध्यापिका कांता हरले यांनी भूषविले.

कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती माजी सदस्य तसेच शिक्षिका सविता कांडलकर, भावना मेंढे, माधव तिडके, नंदकिशोर नागपुरे, पंकज चाफले, ज्योत्स्ना चव्हाण, नेहा जाधव, कल्याणी बिडकर तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून आपले बहुमूल्य योगदान दिले. कार्यक्रमाचे संचालन भावना मेंढे तर आभार नेहा जाधव यांनी मानले.

# १३६ फेरीवाल्यांवर कारवाई : दहिसरमध्ये पादचारी प्रथम अभियानाला वेग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पादचाऱ्यांसाठी रस्ते आणि पदपथ मोकळे करण्याच्या उद्देशाने मुंबई महापालिकेच्या 'पादचारी प्रथम' अभियानांतर्गत दहिसर पूर्व आणि पश्चिम परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. पादचारी प्रथम अभियानांतर्गत आतापर्यंत तब्बल १३६ अनधिकृत



फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आल्याचे आर उत्तरचे सहाय्यक आयुक्त रोहित त्रिवेदी यांनी सांगितले. पदपथ हे पादचाऱ्यांना चालण्यासाठी असून सुरक्षित फुटपाथ पादचाऱ्यांच्या हक्काचे आहेत. अतिक्रमण मुक्त फुटपाथ यासाठी मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांनी पादचारी प्रथम अभियान हाती घेतले आहे. दहिसर पूर्वेत पश्चिमेला अतिक्रमण मुक्त फुटपाथ ही कारवाई उपायुक्त मनिष वळंजु यांच्या मार्गदर्शनाखाली व आर उत्तर विभागाचे सहायक आयुक्त रोहित त्रिवेदी यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली आहे.

# ७ गावातील रिक्त असलेल्या कोतवाल पदाचे आरक्षण तहसिल कार्यालयात सोमवारी निघणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील ७ गावातील रिक्त असलेल्या कोतवाल पदाचे आरक्षण येत्या २१ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता तहसिल कार्यालयात काढण्यात येणार आहे.

तालुक्यातील बेनोडा (शहीद), जरुड




भाग-१, आमनेर, पवनी, जामगांव, झटामझिरी व एकदरा या साझ्यातील महसुल सेवक (कोतवाल) पदे भरण्यात येणार आहे. त्याकरीता विभागीय आयुक्त अमरावती येथील मागासवर्गीय कक्षाकडुन बिंदुनामावली प्रमाणित करण्यात आलेली आहे. या संपुर्ण ७ ही साझ्यातील महसुल सेवक (कोतवाल) पदे भरण्याकरीता ही सोडत असणार असून या आरक्षण सोडतीकरीता उपस्थित राहण्यास इच्छुक असणाऱ्या नागरिकांनी आपली हजेरी लावावी, असे आवाहन तहसिलदार रामदास शेळके यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# संतोष पंडित यांची येरवडा कारागृहातून सुटका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – सोशल मिडिया प्रभावक आणि सामाजिक कार्यकर्ते संतोष गजानन पंडित यांना पुणे सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर येरवडा मध्यवर्ती कारागृहातून त्यांची सुटका झाली. मंत्री चंद्रकांत पाटील आणि एका महिला नगरसेविकेबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या आरोपावरून कोथरूड पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

२ सप्टेंबर रोजी यूट्यूबवर अपलोड करण्यात आलेल्या व्हिडिओबाबत ३६ वर्षीय महिलेने तक्रार दाखल केली होती. त्यानंतर कोथरूड पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. जामीन अर्जाच्या सुनावणीवेळी पंडित यांच्या वकिलांनी आरोपांतील हेतू आणि कथित वक्तव्याच्या स्वरूपाबाबत युक्तिवाद केला.

न्यायालयाने उर्वरित तपासासाठी कोठडी आवश्यक नसल्याचे नमूद करत २५ हजारच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. प्रसारमाध्यमांचे आभार सुटकेनंतर पंडित यांनी सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे थांबवणार नसल्याचे सांगितले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून देशाच्या न्यायव्यवस्थेवर आपला पूर्ण विश्वास असल्याचे त्यांनी नमूद केले.


# मुंढवा शासकीय जमीन गैरव्यवहार प्रकरण : पार्थ पवारांविरुद्ध गुन्ह्यासाठी याचिका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पुण्यातील मुंढवा येथील सुमारे ४० एकर शासकीय जमिनीच्या कथित गैरव्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते पार्थ पवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

भारत अगेंस्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर पुढील आठवड्यात मुख्य न्यायमूर्ती यांच्यासमोर यावर सुनावणी





होण्याची शक्यता आहे.

पुण्यातील मुंढवा येथील १८०० कोटी रुपये मूल्याच्या ४० एकरजमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांमध्ये खरेदी करण्यात आल्याचा आणि त्यासाठी केवळ ५०० रुपये स्टॅम्प ड्युटी भरल्याचा आरोप आहे. उद्योग संचालनालयाने ४८ तासांत स्टॅम्प ड्युटी माफ केली आणि अवघ्या २७ दिवसांत हा संपूर्ण व्यवहार पूर्ण झाला. अवघे एक लाख रुपये भांडवल असलेल्या कंपनीच्या माध्यमातून हा व्यवहार करून तिथे आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्याची तयारी सुरू होती,असा दावा केला आहे.

या जमिनीबाबत २००६ मध्ये मूळ मालकांकडून मुखत्यारपत्र घेण्यात आले होते आणि नंतर २०२५ मध्ये पार्थ पवार यांच्याशी संबंधित कंपनीला ही जमीन विकण्यात आली होती. हे प्रकरण समोर आल्यानंतर संबंधित व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली होती.

या प्रकरणी मुंढवा पोलीस स्टेशन तसेच पुणे पोलीस आयुक्तांकडे तक्रार करूनही पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला नाही, त्यामुळे उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागत आहे.

## वैद्य पितापुत्राच्या स्मृतिदिनानिमित्य

# रविवारी वरुडात विशेष व्याख्यानाचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – प्रसिध्द अस्थिरोग तज्ञ स्व.डॉ.अमोल वैद्य यांच्या २० व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे माजी सचिव स्व.के.डी.वैद्य यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त स्व.डॉ.अमोल वैद्य नगर वाचनालय व डॉ.अमोल वैद्य स्मृती विश्वस्त मंडळ वरुड यांचे वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

वरुड येथील स्व.के.डी.वैद्य स्मृती सभागृहात २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात 'महात्मा फुले आधुनिक भारताचे निर्माते' या विषयावर महानुभाव संप्रदाय अभ्यासक तथा राज्य सेवा





दल राज्य उपाध्यक्ष प्रा.संदीप तडस यांचे व्याख्यान होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.मनोहर आडे राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणुन संचालक एस.एन.बेलसरे, प्रतिष्ठित व्यापारी कनुभाई पटेल, स्वीकृत नगरसेवक योगेश्वर खासबागे, गजानन हार्डवेअरचे संचालक शालीकराम वाडबुदे यांची उपस्थिती राहणार आहे.

स्व.डॉ.अमोल वैद्य आणि स्व.के.डी.वैद्य यांच्या वैद्यकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्याच्या स्मृती जपण्यासाठी तसेच महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्व.डॉ.अमोल वैद्य नगर वाचनालय व डॉ.अमोल वैद्य स्मृती विश्वस्त मंडळ वरुड यांच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

## डेबुजी महाराज ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था जरुडची

# रविवारी वार्षिक सभा, गुणगौरव व कर्मचाऱ्यांचा सत्कार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – डेबुजी महाराज ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था जरुडची सन २०२५-२६ ची वार्षिक सर्वसाधारण सभा येत्या २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता जरुडच्या राऊत सेलिब्रेशन हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे.

यावेळी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव तसेच सेवानिवृत्त सभासद व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजताच्या होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द स्त्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.प्रविण ठाकरे राहतील तर बक्षीस वितरक म्हणुन आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर उपस्थित राहतील.

कार्यक्रमाला माजी सरपंच व माजी सैनिक सुधाकर मानकर, माजी प्राचार्य उल्हास तडस, महात्मा गांधी तंटामुक्त समिती अध्यक्ष रविंद्र बानगळे, जरुड सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष जगदीश देशमुख, कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक अमित कुबडे, माजी ग्रामपंचायत सदस्य सुधिर मामा धर्मे यांच्यासह विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष रविंद्र शा.सुरजुसे, उपाध्यक्ष रमेश रा.मालधुरे, संचालक अशोक तु.दारोकर, मधुकर शे.ढोरे, नामदेव द.वसुले, रमेश तु.दातीर, धनराज न.वानखडे, राजेंद्र मा. लाड, ज्ञानेश्वर ना.बनसोडकर, भैय्याजी म.धुर्वे, रेखा म.राऊत, योगीता म.ढोरे, स्विकृत संचालक शेषराव द.दारोकर, प्रतिभा म.बंदे, विजय वा.फुसे, अनंता ज्ञा.पोकळे, हरिविजय रानोटकर, अनुप मानेकर, राजेंद्र फुसे, वसंतराव घोटकर, विनायक खेरडे, सारीका सोनारे, डॉ.शरद कावळे, संजय पाटील, सुरेंद्र काकडे, प्रविण नथिले, अमित कुबडे, रमेश धोतरकर, नरेंद्र शिंगाडे, प्रविण नाडेकर यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# संपादकीय

**{ ती आपल्या मनाच्या लढाऊ वृत्तीत असते. }**

## तरुणाईवर राज्य करणारा नेता : विश्वास, संवाद आणि बदलाचे राजकारण

देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात प्रत्येक काळात काही नेते असे उदयास येतात, जे केवळ निवडणुका जिंकत नाहीत, तर तरुणांच्या मनातही आपते स्थान निर्माण करतात. आजच्या डिजिटल युगात तरुणाईवर प्रभाव टाकणे ही केवळ भाषणांची किंवा प्रचाराची बाब राहिलेली नाही. सोशल मीडिया, रोजगार, शिक्षण, कौशल्यविकास, स्टार्टअप संस्कृती, क्रीडा, तंत्रज्ञान आणि बदलाची आकांक्षा या सर्व गोष्टींशी जोडून संवाद साधणारा नेता तरुणांच्या चर्चेचा विषय ठरतो. त्यामुळे तरुणाईवर राज्य करणारा नेता ही संकल्पना व्यक्तिपूजेपेक्षा नेतृत्वाच्या त्या गुणांवर प्रकाश टाकणारी आहे, जे युवकांना आकर्षित करतात. आजचा तरुण पारंपरिक राजकारणापेक्षा परिणामकारक नेतृत्व शोधतो. त्याला केवळ आश्वासने नकोत, तर संधी हव्या आहेत. रोजगाराची निर्मिती, दर्जेदार शिक्षण, उद्योजकतेला चालना, डिजिटल सुविधा, पारदर्शक प्रशासन आणि स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य या अपेक्षा पूर्ण करणारे नेतृत्व त्याला अधिक जवळचे वाटते. त्यामुळे आज कोणत्याही नेत्याची लोकप्रियता ही केवळ सभांतील गर्दीवर नव्हे, तर तरुणांच्या अपेक्षांना कितपत प्रतिसाद दिला जातो यावर अवलंबून असते. तरुणांशी संवाद साधण्याची पद्धतही बदलली आहे. पूर्वी चौकातील सभा आणि पोस्टर हा प्रचाराचा मुख्य आधार होता; आज मोबाईल स्क्रीन हीच सर्वात मोठी सभा बनली आहे. काही सेकंदांच्या व्हिडिओतून, थेट संवादातून आणि सोशल मीडियावरील उपस्थितीत नेत्याची प्रतिमा तयार होते. मात्र, या आभासी लोकप्रियतेपलीकडे प्रत्यक्ष कामाचे महत्त्व कायम आहे. कारण तरुण वर्ग माहितीची पडताळणी करणारा आहे. तो प्रश्न विचारतो, तुलना करतो आणि अनुभवाच्या आधारे मत बनवतो. रोजगाराचा प्रश्न हा तरुणांच्या आयुष्यातील सर्वात मोठा विषय आहे. शिक्षण पूर्ण करूनही रोजगाराच्या शोधात भटकणाऱ्या युवकांची संख्या कमी नाही. स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया, उद्योगांना चालना, कौशल्य प्रशिक्षण आणि नवउद्योजकांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे हे कोणत्याही नेतृत्वापुढील मोठे आव्हान आहे. तरुणांच्या मनावर प्रभाव टाकणारा नेता तोच ठरतो, जो या प्रश्नांवर ठोस दिशा देतो. शिक्षणाच्या क्षेत्रातही बदलत्या काळानुसार धोरणांची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, डेटा सायन्स, डिजिटल मार्केटिंग आणि हरित तंत्रज्ञान यांसारख्या नव्या क्षेत्रांत संधी निर्माण होत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत या संधी पोहोचविण्यासाठी शिक्षणव्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक आहे. तरुणाईला भविष्याभिमुख शिक्षण देणारे नेतृत्व अधिक विश्वासार्ह ठरते. स्टार्टअप संस्कृतीने तरुणांच्या विचारसरणीत मोठा बदल घडवला आहे. नोकरी मागण्याऐवजी नोकरी निर्माण करण्याची मानसिकता वाढत आहे. यासाठी आर्थिक मदत, प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि उद्योगस्नेही वातावरण आवश्यक आहे. ग्रामीण भागातील तरुणांमध्येही कृषी प्रक्रिया उद्योग, डिजिटल सेवा, पर्यटन आणि लघुउद्योगांच्या माध्यमातून संधी निर्माण होऊ शकतात. या दिशेने काम करणाऱ्या धोरणांना युवकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळतो.

# बंडूकाका : माणसं कमावणारा दिलदार माणूस

**'उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दिसे।**
**हें घटिकायंत्र तैसें । परिभ्रमे गा ?'**

संत ज्ञानेश्वरांच्या या ओवीप्रमाणे जन्म-मरणाचे हे रहाटगाडगे अविरत सुरू असते. ज्याप्रमाणे सूर्याचे उगवणे आणि मावळणे याची वेळ निश्चित असते, त्याप्रमाणे प्रत्येक मनुष्याचा जन्म आणि मृत्यूचा प्रवासही नियतीने ठरवलेला असतो. मात्र एखाद्या व्यक्तीचा मृत्यू अपेक्षेपेक्षा लवकर आणि अकस्मात झाला, की मागे राहिलेल्या कुटुंबीयांच्या आणि आप्तस्वकीयांच्या मनात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघत नाही.

अशाच एका आकस्मिक दुःखद घटनेने वानखडे परिवारावर तसेच संपूर्ण परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला. गोपाळ श्रावणजी वानखडे, सर्वांचे लाडके बंडूकाका तथा बंडूपाटील, यांचे शुक्रवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने अकस्मात निधन झाले. झटका एवढा तीव्र होता की, वरूड येथील दवाखान्यात घेऊन जाण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली.

**ही घटना आजही मनाला पटत नाही.**

काकांना आम्ही कधी आजारी पडलेले पाहिले नव्हते. लहानपणापासूनच ते अत्यंत उत्साही आणि खेळाडूवृत्तीचे होते. कबड्डी, पोहणे आणि कुस्ती या तिन्ही खेळांमध्ये ते तरबेज होते. मजबूत शरीरयष्टी आणि सदैव उत्साहाने भरलेले व्यक्तिमत्त्व ही त्यांची ओळख होती. त्यांना व्यायामाची विशेष आवड होती. स्वतःच्या आरोग्याबरोबरच गावातील तरुणांनीही व्यायाम आणि क्रीडेकडे वळावे, अशी त्यांची मनापासून इच्छा होती.तसेच शरद जोशींच्या शेतकरी संघटनेत शेतमालच्या भावासाठी अनेकदा दिलीप भोयर यांच्या खांद्याला खांदा लावून आंदोलनात सहभाग घेतला.

सरपंचपदाची जबाबदारी सांभाळत असताना गावातील तरुणांसाठी व्यायामशाळा उभारण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. तरुण पिढी सुदृढ, शिस्तबद्ध व्हावी यासाठी व्यायाम व खेळाचे महत्त्व ते नेहमी सांगत असत.

गावाच्या विकासाबरोबरच पर्यावरण आणि स्वच्छतेबाबतही त्यांना विशेष आस्था होती. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामपंचायत पेठ-मांगरूळीला पर्यावरण व स्वच्छता विभागात प्रथम क्रमांक मिळवून देण्यात यश आले. तसेच तंटामुक्त गाव पुरस्कार पण प्राप्त केला गाव स्वच्छ, सुंदर आणि निरोगी असावे, ही त्यांची मनापासून इच्छा होती.गावातील विहीरिची पाण्याची पातळी वाढावी म्हणून तलाव खोलीकारण करून घेतले.गावातील शाळेतील सर्व बॅच मधील गुणवंत विद्यर्थ्यांचा सत्कार संभारभ आयोजित केले तसेच लोकांवर्गीणीतून बरेच कामे मार्गी लावले.

शेतीचीही त्यांना विशेष आवड होती. शेती हा केवळ व्यवसाय नसून आपल्या ग्रामीण जीवनाचा आणि संस्कृतीचा आधार आहे, या भावनेने ते शेतीकडे पाहत. शेतीची कामे, शेतातील माणसे आणि ग्रामीण जीवनाशी त्यांचा मनापासून जिव्हाळा होता.

बंडूकाकांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक मोठा गुण म्हणजे त्यांचा सर्वधर्मसमभावाचा विचार. कोणताही धर्म, जात-पंथ किंवा भेद न मानता सर्व माणसांशी समानतेने आणि आपुलकीने वागणे हा त्यांच्या स्वभावाचा भाग होता. समाजात प्रेम, बंधुभाव आणि सलोखा टिकून राहावा, अशी त्यांची भूमिका होती.

त्यांच्या भोवती नेहमीच लहान मुलांचा घोळका असायचा. मुलांशी ते प्रेमाने आणि आपुलकीने वागत. त्यांच्या साध्या, प्रेमळ आणि दिलखुलास स्वभावामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाला त्यांच्याजवळ आपलेपणा वाटत असे.

बंडूकाका चार भावंडांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर होते. सर्वात मोठे बाबाड्जगन्नाथराव भाऊजी, दुसऱ्या क्रमांकावर सुधाआत्या, तिसरे बंडूकाका आणि चौथ्या क्रमांकावर पुष्पाआत्या.

मुळात आमच्या संपूर्ण कुटुंबाचा व्यवसाय शेतीचा. बाबा सुरुवातीपासूनच राजकारणात सक्रिय असल्यामुळे शेतीची जबाबदारी



काका सांभाळत होते. बाबांच्या राजकारणातील सहभागामुळे काकांनाही समाजकारण आणि राजकारणाची आवड निर्माण झाली.

बाबांना राजकारणात रस असल्यामुळे काकांनाही सरपंच व्हावे, अशी मनापासून इच्छा होती. गावाने त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्यांना ही संधी मिळाली. त्यांनी पाच वर्षे सरपंच म्हणून गावाचा कारभार चांगल्या रीतीने सांभाळला.

सरपंच म्हणून त्यांनी केवळ पद भूषवले नाही, तर गावातील माणसांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले. गावातील सर्वसामान्य माणसाच्या सुख-दुःखात ते सहभागी होत. कोणीतरी मदतीसाठी त्यांच्याकडे आले तर त्याला आपल्या परीने मदत करण्याचा ते नेहमी प्रयत्न करत.

**'आपला माणूस' ही भावना त्यांच्या स्वभावातच होती.**

काका सहसा रागावणारे नव्हते. घरात आमच्याशी ते फारसे बोलत नसत; पण गावात मात्र ते अत्यंत दिलखुलास व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे गावातील तसेच वानखडे परिवारातील नातेवाईकांमध्ये ते सर्वांना प्रिय होते. आम्ही तीन भावंडे आणि काकांची दोन मुलेहर्षल आणि गौरव. शेतीच्या व्यवसायातून कुटुंबाचा संसार चालवणे सोपे नव्हते. मात्र परिस्थितीची जाणीव ठेवून काकांनी आपल्या दोन्ही मुलांना उच्च शिक्षण दिले. हर्षलला सॉफ्टवेअर इंजिनीर तर गौरवला बी.ई.मॅकेनिकल एम.एस.केले. आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्याचे त्यांचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले.

आम्हा सर्व भावंडांमध्ये रंजू ही एकटीच बहीण असल्यामुळे काकांचे तिच्यावर विशेष प्रेम होते. आमच्या कुटुंबात कदाचित एकमेकांशी फारसे बोलणे नसेल; पण आमच्यातील प्रेम मात्र मनापासून होते. माझेही काकांशी फारसे बोलणे व्हायचे नाही. पण काही नाती शब्दांपेक्षा भावनेतून अधिक घट्ट असतात. काकांचे आणि आमचे नाते असेच होते.

बाबांना चालण्याचा त्रास असल्यामुळे ते सहसा कुठल्या कार्यक्रमाला जाऊ शकत नसत. त्यामुळे काका आमच्या कुटुंबाच्या वतीने जवळजवळ प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहत. केवळ नातेवाईकच नव्हे, तर गावातील मजुरांवरही काकांचे विशेष प्रेम होते आणि मजुरांचेही काकांवर तितकेच प्रेम होते. काका नेहमी सर्वांच्या मदतीला धावून जायचे. त्यांच्या निधनाच्या दिवशी गावातील एकही मजूर कामावर गेला नाही. ही गोष्ट त्यांच्या मनात त्यांनी निर्माण केलेल्या प्रेमाची आणि आदराची सर्वात मोठी साक्ष आहे.

काकांनी संपत्तीपेक्षा माणसं कमावली होती.

म्हणूनच त्यांच्या जाण्याने केवळ एका कुटुंबाचे नुकसान झाले नाही, तर संपूर्ण गावाने आपला जवळचा माणूस गमावला.

मला आणि रंजीतला काकांचा विशेष आधार होता. आमची कुटुंबे वेगवेगळी असली तरी आम्ही नेहमी एकत्र असल्यासारखेच राहिलो. काका आमच्यासाठी केवळ नात्याने काका नव्हते; ते आमच्या सुख-दुःखात आधार देणारे, जवळचे आणि आपले माणूस होते.

**संत तुकाराम महाराज म्हणतात**
**नाशिवंत देह जाणारा ।**
**आयुष्य खातो काळ सावधान ?**

हा देह नाशिवंत आहे आणि काळ आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण घेऊन जात आहे. त्यामुळे आयुष्य क्षणभंगुर आहे, याची जाणीव ठेवून प्रत्येकाने सावध आणि सतर्क राहिले पाहिजे.

तुकोबारायांच्याच अभंगातील आणखी एक विचार जीवनाचा खरा अर्थ सांगून जातो

**याचसाठी केला होता अट्टाहास ।**
**शेवटचा दिवस गोड व्हावा ?**

आयुष्यभर केलेल्या परोपकारातून, माणुसकीच्या वागणुकीतून आणि माणसं जोडण्याच्या वृत्तीतून माणूस आपल्या जीवनाचा शेवट अर्थपूर्ण करीत असतो. बंडूकाका आकस्मिकपणे आपल्यातून निघून गेले; परंतु त्यांच्या जाण्याने संपूर्ण गाव हळहळले, असंख्य डोळ्यांत अश्रू आले आणि प्रत्येकाच्या मनात त्यांच्या आठवणी दाटून आल्या. त्यांच्या जीवनात त्यांनी कमावलेले प्रेम आणि आदर हीच त्यांच्या आयुष्याच्या प्रवासाची आणि 'शेवटचा दिवस गोड व्हावा' या तुकोबारायांच्या विचाराची खरी पावती म्हणावी लागेल. माणूस देहरूपाने या जगातून निघून जातो; मात्र त्याची चांगली कर्मे, माणुसकी, विचार आणि त्याने जोडलेली माणसे त्याला कायम जिवंत ठेवतात.

बंडूकाकांनी आयुष्यभर माणसं जोडली. त्यांनी गावासाठी काम केले, क्रीडा आणि व्यायामाला प्रोत्साहन दिले, व्यायामशाळेसाठी प्रयत्न केले, पर्यावरण आणि स्वच्छतेसाठी योगदान दिले, शेतीशी नाते जपले, सर्वधर्मसमभावाची भावना जोपासली, गरजूंच्या मदतीला धावून गेले आणि आपल्या मुलांना चांगले भविष्य दिले.

त्यांच्या भोवती असणारी माणसं, मुलांचा घोळका, शेतातील त्यांची धावपळ, खेळाबद्दलची आवड आणि प्रत्येकाशी आपुलकीने वागण्याची त्यांची पद्धतया साऱ्या आठवणी आता त्यांच्या जाण्यानंतर अधिकच मौल्यवान झाल्या आहेत.

बंडूकाका आज देहरूपाने आपल्यात नसले तरी त्यांच्या कार्यातून, त्यांच्या आठवणींतून आणि त्यांनी जोडलेल्या असंख्य माणसांच्या हृदयात ते सदैव जिवंत राहतील.

**लाडके बंडूकाका,**
**तुम्ही अचानक निघून गेलात;**
**पण तुमच्या आठवणी आमच्या**
**मनात कायम राहतील.**
**भावपूर्ण श्रद्धांजली!**

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि काकू, हर्षल, गौरव तसेच संपूर्ण वानखडे परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

**ॐ शांती! ॐ शांती! ॐ शांती!**

**रविंद्र जगन्नाथराव वानखेडे**
**मो.९८२२३६७४३२**

# महाशक्तीचे महागडे युद्धबिल कोण भरणार?

**आधुनिक युद्धाचे बिल रणांगणावर लिहिले जात नाही. ते अर्थसंकल्पात, उद्योगात आणि सामान्य नागरिकांच्या खिशातून हळूहळू वसूल होत जाते. महाशक्तीची खरी परीक्षा युद्ध जिंकण्यात नसते, तर त्याची किंमत किती काळ पेलता येते, यात असते.**

फेब्रुवारीच्या अखेरीपासून पश्चिम आशियात अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष सातत्याने तीव्र होत गेला. क्षेपणास्त्र हल्ले, मानवरहित विमान कारवाया, लष्करी तळांवरील प्रत्युत्तरे आणि अखेरीस जूनमध्ये इराणच्या अणुस्थळांवरील अमेरिकेची कारवाई, अशा अनेक टप्प्यांत हे युद्ध पुढे सरकत राहिले. या संपूर्ण संघर्षाचा हिशेब मांडताना अमेरिकेच्या संसदीय अर्थसंकल्प कार्यालयाने १ ऑगस्टपर्यंतचा खर्च तब्बल अडतीस अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचल्याचा अंदाज व्यक्त केला, तर त्यानंतर आणखी सत्त्याऐंशी पूर्णांक सहा अब्ज डॉलर्सच्या अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली. प्रश्न इराणवर किती बॉम्ब पडले याचा नव्हता. प्रश्न असा होता की आधुनिक युद्धाची खरी किंमत नेमकी कोण भरतो.



युद्ध म्हटलं की डोळ्यांसमोर सैनिक, रणगाडे आणि विमाने उभी राहतात. प्रत्यक्षात आधुनिक युद्धाचा सर्वात मोठा खर्च गोळीबार थांबल्यानंतर सुरू होतो. अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार सुरुवातीच्या खर्चापैकी सुमारे २२ अब्ज डॉलर्स केवळ वापरलेल्या क्षेपणास्त्रांचा साठा पुन्हा भरून काढण्यासाठी खर्च झाले. म्हणजे शत्रूवर डागलेले प्रत्येक क्षेपणास्त्र हा फक्त हल्ला नव्हता, तर भविष्यात पुन्हा तयार कराव्या लागणाऱ्या महागड्या शस्त्राची नोंद होती.

ही शस्त्रे साधी नाहीत. त्यामागे वर्षानुवर्षे उभारलेले कारखाने, विशेष प्रकारचे रॉकेट इंधन, स्फोटके, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि प्रशिक्षित मनुष्यबळ असते. युद्ध सुरू करणे एका आदेशावर शक्य असते, पण त्याच युद्धात वापरलेली शस्त्रे पुन्हा तयार करणे इतके सोपे नसते. म्हणूनच इराण संघर्षाने अमेरिकेच्या लष्करी ताकदीइतक्याच तिच्या औद्योगिक क्षमतेचीही परीक्षा घेतली.

या संघर्षात अमेरिकेची अनेक अत्याधुनिक साधनेही गमवावी लागली. अनेक मानवरहित विमाने नष्ट झाली, लढाऊ विमाने आणि इंधन पुरवठा करणाऱ्या विमानांचे नुकसान झाले. एखादे विमान हरवणे ही केवळ खरेदीची बाब नसते. त्याची निर्मिती, त्यातील तंत्रज्ञान आणि त्याच्या जागी नवीन विमान तयार करण्यासाठी लागणारा कालावधी यामुळे त्या नुकसानीची किंमत अनेक पटींनी वाढते.

पश्चिम आशियातील अमेरिकेचे लष्करी तळही या संघर्षापासून अलिप्त राहिले नाहीत. बहरीन, कतार, कुवेत, संयुक्त अरब अमिराती, जॉर्डन, इराक आणि इतर भागांतील अनेक तळांवर हल्ले झाले. संरक्षण संरचना, धावपट्ट्या आणि इमारतींचे नुकसान झाल्याची नोंद अधिकृत अहवालांत करण्यात आली आहे. या सर्वांची दुरुस्ती हा आणखी एक स्वतंत्र खर्च आहे. त्याचबरोबर राजनैतिक कार्यालयांतून कर्मचाऱ्यांचे स्थलांतर, नागरिकांची सुटका आणि आपत्कालीन व्यवस्था उभारण्यासाठीही मोठी रक्कम खर्च झाली.

युद्धाचा सर्वात मोठा परिणाम मात्र अमेरिकेच्या संसदेत दिसून आला. प्रतिनिधीगृहात दीर्घकालीन लष्करी कारवायांवर नियंत्रण आणण्यासाठी ठराव मंजूर करण्यात आला. काही सत्ताधारी सदस्यांनीही या भूमिकेला पाठिंबा दिला. त्याच वेळी प्रशासनाने जवळपास ८८ अब्ज डॉलर्सच्या अतिरिक्त निधीची मागणी केली. यामुळे अमेरिकेत जुना घटनात्मक प्रश्न पुन्हा समोर आला. युद्ध सुरू करण्याचा अधिकार कोणाचा आणि त्यासाठी पैसा मंजूर करण्याचा अधिकार कोणाचा?

या संघर्षातील एक वेगळी बाजू त्यानंतरच्या आर्थिक निर्णयांत दिसून आली. युद्धाचा वाढता खर्च समोर येत असतानाच ट्रम्प प्रशासनाने आर्थिक दबावाचे धोरण अधिक आक्रमक केले. इराणवर थेट लष्करी कारवाईबरोबरच व्यापार आणि वित्तीय निर्बंधांनाही तितकेच महत्त्व दिले गेले. इराणकडून थेट किंवा अप्रत्यक्ष खरेदी करणाऱ्या देशांच्या वस्तूंवर अतिरिक्त आयात शुल्क लावण्याचे अधिकार वापरण्यात आले. त्यानंतर रशिया आणि इराणकडून ऊर्जा खरेदी करणाऱ्या देशांवर शंभर टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याची तरतूद असलेल्या निर्णयांनाही गती मिळाली. याचा परिणाम भारत, चीन आणि इतर ऊर्जा आयातदार देशांवर होऊ शकतो, अशी चर्चा सुरू झाली.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# नंदीग्रानंतर आता रेजीनगरमधील ममतांच्या उमेदवाराची पोटनिवडणुकीतून माघार



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली –** पश्चिम बंगालमधील नंदीग्रामच्या पाठोपाठ, रेजीनगर विधानसभा पोटनिवडणुकीतून ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील टीएमसीचे उमेदवार रबिउल आलम चौधरी यांनीही आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.मतदारांपर्यंत निवडणूक चिन्ह पोहोचवण्यासाठी वेळेचा अभाव आणि कार्यकर्त्यांना संघटित करण्यात येणारी अडचण, ही कारणे देत रबिउल यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. एक दिवस आधी, नंदीग्राममधून ममता बॅनर्जी यांच्या उमेदवार संचिता प्रधान डे यांनीही आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला होता.

काही तासांनंतर, २००७ मधील एका जुन्या खून प्रकरणात मिलन प्रधान यांना अटक करण्यात आली. ही घडामोड अशा वेळी घडली आहे, जेव्हा निवडणूक आयोगाने टीएमसीचे नाव आणि जुने निवडणूक चिन्ह कायम ठेवून दोन्ही गटांना वेगवेगळी नावे आणि चिन्हे दिली आहेत. ममता गटाला 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'फुटबॉलपटू' हे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे.

# गणपती विसर्जनानंतर मोसम नदीत पोहण्याचा मोह जीवावर बेतला, दोन १७ वर्षीय विद्यार्थ्यांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**गडचिरोली –** गणपती विसर्जनासाठी गेलेल्या दोन १७ वर्षीय विद्यार्थ्यांचा मोसम नदीच्या बंधाऱ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला.

नामपूर येथील एका खासगी कोचिंग क्लासच्या गणपतीचे विसर्जन केल्यानंतर ही दुर्घटना घडली. अथर्व दीपक पगार (रा. उतराणे) आणि प्रसाद दादाजी वाघ (रा. नामपूर) अशी मृत विद्यार्थ्यांची नावे आहेत. विसर्जनानंतर बंधाऱ्याजवळ थांबले मिळालेल्या माहितीनुसार, अशोक पाटील यांच्या खासगी कोचिंग क्लासमध्ये गणपतीची मूर्ती बसवण्यात आली होती. पाचव्या दिवशी आरती झाल्यानंतर विद्यार्थी आणि इतरांनी मोसम नदीत गणपतीचे विसर्जन केले. विसर्जनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर इतर विद्यार्थी परतले. मात्र, अथर्व आणि प्रसाद यांना पोहण्याचा मोह झाल्याने ते बंधाऱ्याजवळच थांबले.

पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघेही खोल पाण्यात बुडू लागले. दोघांना बुडताना पाहून त्यांचा तिसरा मित्र विरेन अहिरे याने त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, स्थानिक तरुणांनी प्रसंगावधान राखत त्याला रोखले. त्यामुळे विरेनचा जीव वाचला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच स्थानिक तरुणांनी तातडीने बंधाऱ्यात उतरून अथर्व आणि प्रसाद यांना पाण्याबाहेर काढले. त्यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले. कुटुंबीयांचा आक्रोश; संचालकांवर आरोप दोन्ही विद्यार्थ्यांच्या मृत्यूची माहिती मिळताच रुग्णालयात कुटुंबीयांनी मोठा आक्रोश केला.



अभिनव मित्र परिवार व ग्रुपच्या वतीने

# ऋषीपंचमी निमित्ताने भव्य महादेव कढई प्रसाद



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**जरुड –** जरुड येथील अभिनव मित्र परिवार व ग्रुपच्या वतीने श्रावण मासाच्या अखेरच??या टप्प्याचे तसेच ऋषीपंचमीचे औचित्य साधून सालाबादप्रमाणे यंदाही भव्य महादेव कढई प्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या धार्मिक उपक्रमाला ग्रामस्थ व भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

१७ सप्टेंबर रोजी झालेल्या या कार्यक्रमात महादेवाची भक्तिगीते, आरती व कढई प्रसादाचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण परिसर हर-हर महादेवच्या जयघोषाने भक्तिमय झाला होता. आयोजकांनी भाविकांसाठी प्रसादाची उत्तम व्यवस्था केली होती.

कार्यक्रमाला त्रिमुर्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष शिवाजी वानखडे, वासुदेव वाडबुदे, रिंकेश राजस, माजी सरपंच गणेश देशमुख, विजय बिजवे, दीपक होले, हेमंत टांगसे, जरुड दक्षता समिती अध्यक्ष संजय घोरपडे, गोपाल निचत, डेबूजी नागरी सहकारी पतसंस्था जरुडचे व्यवस्थापक प्रशांत डकरे, वैद्यकीय अधिकारी डॉ.समाधान तायडे, अजय राठोड, रमेश चरपे, रमेश हरले, युवा उद्योजक राजेंद्र कुऱ्हाडे, सूरज बनसोड, रविंद्र वसुले, राहुल बारमासे, संजय काळबेंडे, अक्षय बेले, हर्षद आंडे, जितेंद्र पोकळे, योगेश तुमराम, तेजस सव्वालाखे, हर्षल बिजवे, प्रवीण फुसे, सचिन वानखडे, गजानन चव्हाण, उमेश बाहे, प्रेमराज घोरमाडे यांच्यासह पत्रकार विष्णु राऊत व असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# कडुनिंबाच्या झाडाने घेतला महावितरणच्या खांबाला वेढा!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## महावितरण अधिकाऱ्यांची बघ्याची भुमिका

**हिवरखेड –** ग्रामीण भागात वीज वितरण व्यवस्थेच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कडुनिंबाच्या झाडाने वीज महावितरणाच्या पोलला दिलेला आधार सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

वीज तारांमध्ये वेली गुंतलेल्या असून, काही ठिकाणी पोल व वीजवाहिन्यांची अवस्था धोकादायक असल्याचे निदर्शनास येत आहे.

वीज वितरणासाठी उभारण्यात आलेले पोल आणि त्यावरील जिवंत वीजतारा यांची नियमित देखभाल होणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, झाडांच्या फांद्या, वेली आणि वाढलेली वनस्पती वीजवाहिन्यांमध्ये अडकत असल्याने अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. तसेच वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. कडुनिंबाच्या झाडाने वीज महावितरणाच्या पोलला दिलेला हा 'गोड आधार' दिसायला वेगळा असला, तरी त्यामागील सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे.

संबंधित विभागाने अशा धोकादायक ठिकाणांची तातडीने पाहणी करून झाडांच्या फांद्या व वेली हटवाव्यात. जीर्ण किंवा कमकुवत पोल असल्यास त्यांची दुरुस्ती अथवा आवश्यकतेनुसार नवीन पोल बसविण्यात यावेत, अशी नागरिकांची मागणी आहे.

वीज महावितरण विभागाने नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तातडीने उपाययोजना कराव्यात, जेणेकरुन भविष्यातील संभाव्य दुर्घटना टाळता येतील.



# 'जर रस्ता केला नाही, तर आम्ही मतदान करणार नाही..' मंत्री ज्योतिरादित्य शिंदेंना तरुणांनी तोंडावर सुनावलं! शिंदे महाराज संतापले अन : 'माझ्यासमोर अशी भाषा..'

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई –** केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांना गुना मतदारसंघाच्या दौऱ्यावर असताना नाराजीला तोंड द्यावं लागलं. बरखेडा गिर्दमध्ये आयोजित मुख्यमंत्र्यांच्या जनविश्वास शिबिरात भाग घेतला, जिथे त्यांनी 'नमो ड्रोन दीदी किरण'च्या मदतीने ड्रोन उडवले. या कार्यक्रमादरम्यानचा त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला. जो आता सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला आहे. कार्यक्रमानंतर ज्योतिरादित्य शिंदे यांनी लोकांच्या समस्या ऐकून घेतल्या. दरम्यान, ते आपल्या गाडीत बसून लोकांच्या तक्रारी ऐकत



होते. काही तरुणांनी त्यांचा ताफा थांबवून रस्त्याच्या समस्येबद्दल तक्रार केली. एका तरुणाने रस्ता वेळेवर पूर्ण न झाल्यास मतदान न करण्याची धमकी दिली. शिंदे संतापले आणि म्हणाले, 'माझ्याशी अशा भाषेत बोलू नका.'

नेमकं काय प्रकरण आहे? मतदारसंघातील काही लोक आपली तक्रार घेऊन त्यांच्याकडे आले होते. ते ज्योतिरादित्य शिंदे यांना म्हणाले की, 'माझी विनंती आहे की, यावेळी हा रस्ता वेळेपूर्वीच तयार करावा. जर रस्ता केला नाही, तर आमच्यापैकी कोणीही मतदान करणार नाही.' यावर शिंदे संतापल्याचे दिसून आले. 'माझ्याशी कधीही अशी भाषा वापरू नका. मी सर्वांबद्दल बोलत आहे.' ते पुढे म्हणाले, 'तुम्ही येऊन विनंती करता, तर काम करणे ही माझी जबाबदारी आहे.' मंत्र्यांचा संतप्त सूर आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमुळे शिंदे यांना सोशल मीडियात टीकेला सामोरे जावे लागत आहे.

पी.एम.श्री.नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र.४ मध्ये

# मातीपासून गणेशमुर्ती तयार करण्याची स्पर्धा



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट –** येथील पी.एम.श्री.नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र.४ मध्ये मोठ्या उत्साहात मातीपासून गणेशमुर्ती तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेचे उदघाटन नगराध्यक्षा सुवर्णा वरखडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षण समिती सभापती निलिमा कुबडे, नगरसेविका संगीता अकर्ते, सुनीता उईके आणि नगरसेवक विजय चौधरी उपस्थित होते.

गणेशमूर्ती तयार करुन त्यांची वर्गवार मांडणी करण्यात आली आणि त्यांच्या परिक्षणाची जबाबदारी नगर परिषदे आरोग्य निरीक्षक सुशिल गुरवे आणि नगर समन्वयक विक्रम खोडके यांनी पार पाडली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका कांता हरले, शाळेचे सर्व शिक्षक सविता कांडलकर, भावना मेंढे, ज्योत्स्ना चव्हाण, नेहा जाधव, कल्याणी बिडकर, माधव तिडके, पंकज चाफले, नंदकिशोर नागपुरे तसेच शाळेचे शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे

# सायन्स फोरमचे जागतिक ओझोन दिवस साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड –**श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे सायन्स फोरमचे जागतिक ओझोन दिवसाचे औचित्य साधून थाटात उदघाटन पार पडले.




या उदघाटन कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.दिलीप हांडे तर प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणुन विद्याभारती महाविद्यालयाचे डॉ.पी.एस.बोडखे, इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स नागपूरच्या डॉ.ए.एल.महाकालकर ह्या उपस्थित होत्या. महाविद्यालयामध्ये दरवर्षी विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतर्फे सायन्स फोरमची स्थापना करण्यात येते. ह्या वर्षी हा सायन्स फोरम कार्यक्रम महाविद्यालायच्या रिसर्च अँड डेवलपमेंट सेल सोबत आयोजित करण्यात आला होता. या सायन्स फोरम मध्ये विविध विज्ञान विषयाच्या अभ्यास मंडळाची कार्यकारणी नियुक्त केली गेली. या विविध मंडळामध्ये रसायनशास्त्र अभ्यास मंडळ, भौतिकशास्त्र अभ्यास मंडळ, इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळ, संगणक विज्ञान, गणित अभ्यास मंडळ, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र मंडळाची स्थापना करण्यात आली.

ह्या सायन्स फोरमच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध विज्ञान ऍक्टिव्हिटी, विविध स्पर्धा, सेमिनार, कार्यशाळा, इत्यादी घेतल्या जातात व सर्व विद्यार्थी यामध्ये दरवर्षी सक्रिय सहभाग नोंदवतात. अशा विविध प्रकारच्या कृती व स्पर्धांमध्ये भाग घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयक दृष्टिकोन हा अधिक दृढ होऊन त्यांना नवनवीन तंत्रज्ञान व त्याची दैनंदिन जीवनात आवश्यकता व जबाबदारी याची जाणीव होते. महाविद्यालयामध्ये सायन्स फोरमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेला व नवीन गोष्टी शिकण्याच्या वैधानिक बुद्धिमत्तेला चालना मिळते.

या विज्ञान फोरमचे उदघाटनपर भाषणामध्ये डॉ.पी.एस.बोडखे यांनी विद्यार्थ्यांना डिप्लेशन ऑफ ओझोन लेअर या विषयावर विस्तृत असे व्याख्यान दिले व आपल्या व्याख्यानामधुन आपण ओझोन स्तर समतोल ठेवण्यासाठी काय करावे याविषयी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणुन आलेल्या डॉ.ए.एल.महाकालकर यांनी फॉरेन्सिक सायन्सच्या मूलभूत संकल्पना व अभ्यास तसेच फॉरेन्सिक सायन्सचे गुन्हेगारी जगात कसे मोलाचे महत्त्व आहे हे विद्यार्थ्यांना समजुन सांगितले.तसेच त्यांनी या क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या विविध फेलोशिप व इतर कोर्सेसविषयी विद्यार्थ्यांना भरपूर मार्गदर्शन केले. सायन्स फोरम २०२६ चे समन्वयक म्हणुन रसायनशास्त्र विभागाचे प्रा.वैभव गुल्हाने यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले तसेच रिसर्च व डेव्हलपमेंट सेल्सचे समन्वयक डॉ.वाय.एस.तामगाडगे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडली.

कार्यक्रमाचे संचालन भौतिकशास्त्र विभागाची जवेरिया काझी तर उपस्थितांचे आभार गौरी वानखडे हिने मानले. या सायन्स फोरमचे सदस्य डॉ.रिणा बकाले, डॉ.प्रांजली देशमुख आणि डॉ.नीरज इंगळे व डॉ.बी.एस.राहिले यांनी कार्यक्रमासाठी प्रयत्न केले. सायन्स फोरमच्या उदघाटन सोहळ्यासाठी विविध अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व कार्यकारी सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विविध विज्ञान विभागाचे विभाग प्रमुख डॉ.राजेश गणोरकर, डॉ.सुनील कोंडूलकर, डॉ.संजय सातपुते प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते तसेच सर्व शिक्षक, शिक्षेकतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## वरुड तालुक्यातील महालक्ष्मी दर्शन



०१

नांदगाव – येथील किसन वामनराव भिसे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन



०३

वरुड – जिजाऊ नगर परिसरातील डॉ.लक्ष्मणराव कोहळे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन



०५

वरुड – महात्मा फुले नगर परिसरातील लक्ष्मीकांत दळवी यांचे कडील महालक्ष्मी दर्शन



०७

वरुड – शहरातील जिजाऊ नगर परिसरातील अरविंद वडस्कर यांचेकडील महालक्ष्मी दर्शन



०९

वरुड – शहरातील सराफा लाईन परिसरातील रहिवाशी प्रसिध्द सराफा व्यावसायिक प्रविण धरमठोक यांचेकडील महालक्ष्मी दर्शन

# शिवसेनेचा उद्धव ठाकरेंवर व्यंगचित्रातून सडेतोड प्रहार

## 'लंडनचे यश खुपते, म्हणून पोटात दुखते' म्हणत साधला निशाणा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने, उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर एका खोचक व्यंगचित्राच्या माध्यमातून जोरदार हल्लाबोल केला आहे. उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी छत्रपती संभाजीनगर दौऱ्यादरम्यान केलेल्या टीकेला उत्तर देताना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने व्यंगचित्राच्या माध्यमातून जोरदार प्रतिहल्ला चढवला आहे. शिवसेनेच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यांवरून एक बोचरे व्यंगचित्र शेअर करत ठाकरेंच्या 'राजकीय पोटदुखीवर' खोचक भाष्य करण्यात आले आहे. शिवसेनेने शेअर केलेल्या या मार्मिक व्यंगचित्रात राजकीय परिस्थितीवर अत्यंत थेट भाष्य करण्यात आले आहे. व्यंगचित्रात एका टीव्ही स्क्रीनवर बातम्या सुरू असल्याचे दाखवले आहे. त्यावर 'ब्रेकिंग न्यूज: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा लंडनमध्ये ३ पुरस्कारांनी सन्मान!' अशी हेडलाईन झळकत आहे. ही बातमी पाहताच टीव्हीसमोर बसलेल्या उद्धव ठाकरे यांच्या पोटात तीव्र कळा येत असल्याचे आणि ते वेदनेने हतबल झाल्याचे चित्र आहे. हतबल झालेले उद्धव ठाकरे टीव्ही बंद करायला सांगत, 'बंद कर तो टीव्ही, पोटात कळ मारते माझ्या ह्यांची प्रगती बघून!' असा संवाद त्यांच्या तोंडी दाखवण्यात आला आहे. छ त्र प ती संभाजीनगर दौऱ्यातील टीकेला प्रत्युत्तर उद्धव ठाकरे यांनी नुकत्याच झालेल्या आपल्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्यात महायुती सरकारवर आणि विशेषतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लंडन दौऱ्यावर सडकून टीका केली होती. या दौऱ्यावरून त्यांनी शिंदेंवर विविध आक्षेप घेतले होते. ठाकरेंच्या याच टीकेचा खरपूस समाचार घेण्यासाठी शिवसेनेने डिजिटल माध्यमांवर हे व्यंगचित्राचे अस्त्र उपसले आहे. दुसऱ्याचे यश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेला सन्मान न पचल्यामुळेच विरोधकांना अशी 'पोटदुखी' जडली आहे, असा टोला यातून लगावण्यात आला आहे.

---

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा दोन दिवसीय कोल्हापूर दौरा रद्द

## हुबळीतून थेट दिल्लीला रवाना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा दोन दिवसीय कोल्हा-पूर दौरा रद्द झाला आहे. हुबळीमधील दौरा संपवून अमित शाहांचा कोल्हापूर दौरा प्रस्तावित होता. मात्र, हुबळीतून त्यांनी दिल्ली गाठली. दरम्यान, केएलई (घडए) सोसायटीचे वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि वैद्यकीय संशोधन केंद्राचे उद्घाटन करण्यासाठी हुबळी दौऱ्यावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह प्रकृती अस्वास्थ्यामुळे नियोजित उद्घाटन समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत. काल 'डेनिसन्स हॉटेल'मध्ये मुक्काम केल्यानंतर, आज (१९ सप्टेंबर) सकाळी केएलई रुग्णालयाच्या उद्घाटन समारंभात ते सहभागी होणार होते. मात्र, प्रकृती बिघडल्यामुळे ते हॉटेलमध्येच थांबले. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र, खासदार बसवराज बोम्मई आणि माजी मंत्री मुरुगेश निराणी, सी. सी. पाटील, इराण्णा कडाडी, अभय पाटील व रमेश कट्टी यांनी उद्घाटन समारंभाला जाण्यापूर्वी हॉटेलवर जाऊन अमित शाह यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. अमित शाहांचा महत्वाकांक्षी प्रकल्प 'जवाहर'ला दुसरीकडे, अमित शाहांचा महत्वाकांक्षी ६०० कोटींचा प्रकल्प प्रकाश आवाडेंच्या 'जवाहर' साखर कारखान्याला मिळाला आहे. या प्रकल्पाच्या पायाभरणीसाठी अमित शाह कोल्हापूर दौऱ्यावर येणार होते. शून्य कचरा (नशी ऋरीलरसश) संकल्पनेतून साखरेवर प्रक्रिया करणारा हा देशातील पहिला बहुराज्य सहकार तत्त्वावरील प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च ६०० कोटी रुपये आहे. हा प्रकल्प कोल्हापूर जिल्ह्यातील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर सुरू करण्याचे निश्चित झाले आहे.

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, प्रभारी सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६९७/२०२६** **ने.ता.२६/११/२०२६**

**अर्जदार :-**

सुधाकर भिमराव धोटे

वय अं.५६ वर्ष, धंदा-मजुरी

रा.इसंबरी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत नामे निर्मला भिमराव धोटे, रा.इंसबरी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, प्रभारी सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७००/२०२६** **ने.ता.२६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती सविता राजेंद्र बारमासे, वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम

२) मनोज राजेंद्र बारमासे, वय अं.१७ वर्ष, धंदा-शिक्षण

३) वेदान्त राजेंद्र बारमासे, वय अं.१४ वर्ष, धंदा- शिक्षण

अर्जदार क्र.१ ते ३ रा.जामठी गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे राजेंद्र प्रभाकर बारमासे, रा.जामठी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## वरुड तालुक्यातील महालक्ष्मी दर्शन



०२

सुरळी – येथील देवेंद्र भागवतकर यांचेकडील महालक्ष्मी दर्शन



०४

मांगरुळी पेठ – येथील माजी सरपंच विजय यावले यांचे कडील महालक्ष्मी दर्शन



०६

वरुड – शहरातील पदमावती कॉलनी परिसरातील रहिवाशी, पवनी स.येथील उपसरपंच बंडु गोळे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन



०८

लोणी – मंगेश आसरे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन



१०

वरुड – शहरातील जिजाऊ नगर परिसरातील शंकरराव ठाकरे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन




# जळगावात कापसाला हंगामाच्या सुरुवातीलाच ८,५०० रुपये भाव, दरवाढीची शक्यता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जळगाव** – जळगाव जिल्ह्यात यंदाच्या कापूस खरेदी हंगामाला सुरुवात झाली असून, जिनिंग आणि बाजार समित्यांमध्ये कापसाची आवक हळूहळू वाढू लागली आहे. लागवड क्षेत्रात यंदा काहीशी घट झाली असली, तरी गेल्या वर्षीच्या तुलनेत अतिवृष्टीचा मोठा फटका बसलेला नसल्याने कापसाचे उत्पादन आणि गुणवत्ता चांगली राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जागतिक बाजारात कापसाची तूट? यंदा आंतरराष्ट्रीय पातळीवर कापसाचे उत्पादन सुमारे ११ कोटी ७३ लाख गाठी, तर सूतगिरण्यांची मागणी सुमारे १२ कोटी २९ लाख गाठी राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे जागतिक बाजारात सुमारे ५० लाख गाठींची तूट निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यातच जुन्या कापसाच्या साठ्यातही कमतरता असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाची मागणी वाढण्याची शक्यता आहे. याचा फायदा भारतीय कापसाला होऊ शकतो. विशेषतः बांगलादेश, व्हिएतनामसह इतर देशांमध्ये भारतीय कापसाच्या निर्यातीसाठी संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. जळगावात सुरुवातीलाच ८,५०० रुपयांपर्यंत भाव दरम्यान, जळगाव जिल्ह्यात हंगामाच्या सुरुवातीलाच कापसाला ८,५०० रुपयांपर्यंतचा भाव मिळत आहे. यंदा कापसाची गुणवत्ता चांगली राहण्याची शक्यता असून, जागतिक बाजारातील मागणी कायम राहिल्यास कापसाच्या दरात आणखी वाढ होऊ शकते.

शेतकऱ्यांना दरवाढीची आशा आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणी, कापसाची उपलब्धता आणि यंदाची गुणवत्ता या बाबींचा दरांवर परिणाम होणार आहे. त्यामुळे कापसाचे दर यंदा तुलनेने स्थिर राहण्याची आणि मागणी वाढल्यास दर आणखी सुधारण्याची शक्यता कापूस बाजारातील व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. यामुळे जळगाव जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे यंदाच्या हंगामातील दरांकडे विशेष लक्ष लागले आहे.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | ३००० |
| तूर | ६१०० | ६३९० |
| मूग | ६५०० | ७००० |
| उडीद | ६००० | ७००० |
| हरभरा | ५६०० | ५९०० |
| सोयाबिन | ४१०० | ४३५० |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | ८२०० | ९३०० |
| भुईमूग | ५१५० | ५३५० |
| मका | २२०० | २३०० |

# ७० फूट उंच बांभोरी पुलावरून महिलेने नदीत उडी घेतली

**१५ तास उलटले तरी ठावठिकाणा नाही**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जळगाव** – जळगाव शहरालगत असलेल्या बांभोरी पुलावरून गिरणा नदीपात्रात उडी घेतलेल्या विवाहितेचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही. प्राथमिक माहितीनुसार, जयश्री चौधरी असे या महिलेचे नाव असल्याचे समोर आले आहे. सुमारे ७० ते ८० फूट उंच पुलावरून महिलेने नदीपात्रात उडी घेतल्याची घटना घडली. घटनेनंतर तातडीने शोधमोहीम सुरू करण्यात आली. महिलेने नदीपात्रात उडी घेतल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि बचाव पथकांकडून नदीपात्रात शोध घेण्यास सुरुवात करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत नदीपात्र आणि परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली. मात्र, अंधार आणि नदीपात्रातील परिस्थितीमुळे रात्री शोधमोहीम थांबवण्यात आली. यानंतर आज सकाळी ८ वाजल्यापासून पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. परिसरातील पोहणाऱ्यांच्या मदतीने नदीपात्रात महिलेचा शोध घेतला जात आहे.

# बनावट कॉल सेंटरवर ईडीची कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** - अमेरिकन नागरिकांची कथित फसवणूक करणाऱ्या बनावट कॉल सेंटरच्या नेटवर्क विरोधात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) पुणे, पतियाळा आणि चंदीगड येथे कारवाई केली. ईडीच्या हैदराबाद विभागीय कार्यालयाने केलेल्या या कारवाईत तीन कार्यरत बनावट कॉल सेंटर आढळून आली. त्याठिकाणी सुमारे २२० जण कार्यरत असल्याचे तपासात समोर आले. ईडीच्या माहितीनुसार, या कॉल सेंटरमधून अमेरिकन नागरिकांना विविध खोट्या कारणांवरून संपर्क साधून त्यांच्याकडून पैसे उकळल्याचा आरोप आहे. कारवाईदरम्यान ६६ मोबाईल फोन, १३ लॅपटॉप, हार्ड डिस्क, इतर डिजिटल उपकरणे, रोकड आणि कागदपत्रे जप्त करण्यात आली. या उपकरणांमध्ये कथित फसवणुकीची कार्यपद्धती, ग्राहकांची माहिती आणि पैशांच्या व्यवहारांशी संबंधित डिजिटल पुरावे आढळल्याचे ईडीने सांगितले.चंदीगडमधील एका निवासस्थानीही तपास करण्यात आला. हे ठिकाण पतियाळातील कॉल सेंटरच्या कथित नियंत्रणासाठी वापरले जात असल्याचा ईडीचा दावा आहे.

# स्वीकृत नगरसेवकांच्या सात जागांसाठी रणधुमाळी : न्यायालयाच्या दणक्यानंतर निवडणुकीचा बिगुल, २४ सप्टेंबरला विशेष महासभा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**उल्हासनगर** – उल्हासनगर महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकांच्या निवडणुकीवरील स्थगिती अखेर उठली असून, न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. महापालिका प्रशासनाने २४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विशेष महासभा आयोजित केली आहे. सात स्वीकृत नगरसेवकांच्या जागांवर कोणाची वर्णी लागणार, यावरून सत्ताधारी शिवसेना-भाजप युतीमध्ये पुन्हा राजकीय मोर्चेबांधणीला वेग आला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर उल्हासनगर महापालिकेतील बहुचर्चित सात स्वीकृत नगरसेवकांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. महापालिका सचिव डॉ.दीपाली चौगले यांनी १७ सप्टेंबर रोजी काढलेल्या नोटिसीनुसार, न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून ही निवडणूक प्रक्रिया २५ सप्टेंबरपूर्वी पूर्ण करणे प्रशासनाला बंधनकारक आहे. इच्छुक उमेदवारांना २२ सप्टेंबर रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत आयुक्तांच्या दालनात अर्ज आणि आवश्यक वैध कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. यापूर्वी ११ सप्टेंबर रोजी या निवडणुकीसाठी महासभा बोलावण्यात आली होती. मात्र, उमेदवारांच्या नावांवरून सत्ताधारी शिवसेना-भाजप युतीमध्ये मतभेद निर्माण झाल्याने महापौर अश्विनी निकम यांच्या निर्देशानुसार निवडणूक अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आली होती.

# पवईच्या आयआयटी मुंबईमध्ये विद्यार्थ्याचं टोकाचं पाऊल : पोलिसांकडून एडीआर दाखल, ७ महिन्यांत चौथा बळी, विद्यार्थी आक्रमक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबईच्या पवई आयआयटीमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. नामांकित पवई आयआयटी मुंबईमध्ये एका विद्यार्थ्याने आयुष्य संपवल्याची घटना घडली आहे.

विद्यार्थ्याने शुक्रवारी सांयकाळच्या सुमारास टोकाचा पाऊल उचलत आपली जीवनयात्रा संपवली आहे. या घटनेनंतर आता विद्यार्थ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. विद्यार्थ्यांनी कॉलेज कॅम्पस परिसरात आंदोलनाचा नारा दिलाय. या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणी असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स दाखल करण्यात आला असून मुंबई पोलिसांकडून या घटनेचा अधिक तपास सुरू आहे. मुंबई पोलीस सध्या विद्यार्थ्याच्या मृत्यूच्या सभोवतालच्या परिस्थितीचा तपास करत आहेत. साहिल वाकोडेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालयात पाठवण्यात आला आल्याची माहिती आहे. तर तपासाचा भाग म्हणून पोलीस या घटनेला कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचीही तपासणी करत आहेत.

